# वसई विरार शहर महानगरपालिका
## प्रभाग समिती "आय" वसई
## दरपत्रक

**कामाचे नाव :-** दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/०३/२०२१ या कालावधी करीता वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय"वसई अंतर्गत दैनंदिन घाऊक बाजार फी वसुली करिता ठेका पध्दतीने देणे बाबत.

दरपत्रक/पुरवठा धारकाचे पुर्ण नाव :- ----------------------------------------

संपूर्ण पत्ता :- ----------------------------------------

----------------------------------------

दुरध्वनी क्रमांक :- कार्यालय :- ----------------------------------------

:- मोबाईल :- ----------------------------------------

(परिशिष्ट-अ)

| कामाचे नाव | किमान देकार रक्कम रुपये | अभिकर्ताने नमुद करावयाचे रक्कम |
|---|---|---|
| ०१/०१/२०२१ ते ३१/०३/२०२१ या कालावधी करिता वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती आय वसई अंतर्गत येणा-या **गौळवाडा बाजार** फी वसुली ठेका पध्दतीने देणेबाबत. | अपेक्षित रक्कम रुपये १२८८९१/- + १८% जी.एस.टी. | रक्कम रुपये (अंकात)---------------<br>रक्कम रुपये (अक्षरी) ---------------<br>---------------------------------<br>--------------------------------- |

दरपत्रक भरणाऱ्या ठेकेदाराची
तारखेसहीत सही व शिका

# अटी व शर्ती

१. विहीत नमुन्यात भरलेली दरपत्रके दोन लखोटयामध्ये दि.२४/१२/२०२० रोजी दु.३.०० वाजेपर्यंत प्रभाग समिती आय येथे सिलबंद पेटीत टाकावी मूदतीनंतर आलेली दरपत्रके स्विकारण्यांत येणार नाही.

२. सदरील दरपत्रके दि.१८/१२/२०२० ते दि.२४/१२/२०२० दु. ३.०० वाजेपर्यंत स्विकारणेत येतील.

अ) किमान देकार रक्कम -

१. ठेकेदाराने दरपत्रके भरताना दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करुन त्यापैकी अनुक्रमांक १चे लिफाफ्यात तांत्रिक बाबीचा व अ.क्र २ चे लिफाफ्यात रक्कम /दर नमुद करावेत. तसेच दरपत्रक फॉर्म फी व किमान देकार रक्कम रु. रोखिने (मॅन्युअल) भरणा करावयाची आहे.

२. दरपत्रक दोन लखोटे पध्दतीने स्विकारण्यात येतील लखोटा १ मध्ये अटी शर्तीनुसार आवयश्क कागदपत्रे नसल्यास दुसरा लखोटे उघण्यात येणार नाही.

३. सदरच्या किमान देकार रक्कमेवर कोणतेही व्याज देय किंवा अनुज्ञेय असणार नाही.

४. दरपत्रक मंजुर होऊन कार्यादेश प्राप्त करतेवेळी मंजुर दरपत्रक धारकास देकार रक्कमेच्या ५०% रक्कम भरणा करणे आवश्यक आहे व ५०% रक्कम माहे फ्रेबुवारी २०२१ पर्यंत भरणे बंधनकारक राहील. दिलेल्या कालावधीत रक्कम भरणा न केल्यास बाजाराची वसुली करता येणार नाही. तसेच ठेका रद्द करण्यात येऊन आपण भरलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.

५. प्रभाग समिती हद्दीत नैसर्गिक आपत्ती व इतर कोणत्याही कारणामुळे बाजार बंद झाल्यास महानगरपालिकेकडून नुकसान भरपाई मागता येणार नाही.

६. ना फेरीवाला क्षेत्रामध्ये बसणाऱ्या फेरीवाल्यांना अतिक्रमण विभागाकडून उठविण्यात येईल. अभिकर्त्यास त्याबाबत तक्रार करता येणार नाही.

७. बाजार फी वसुली महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दरानुसार करावयाचे आहे. (दराची माहीती संबंधित प्रभागांच्या सहा.आयुक्त यांचे कार्यालयात उपलब्ध असेल.) निश्चित करुन दिलेल्या दरापेक्षा जादा दराने वसुली केल्यास अगर तशा आशयाची तक्रार आल्यास ठेका रद्द करण्यात येईल, व आपली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल. यामुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीस अभिकर्ता जबाबदार राहील.

८. दैनंदिन बाजार वसुलीसाठी लागणारी पावती पुस्तके ठेकेदारास स्वखर्चाने छपाई करुन पावती पुस्तके महानगरपालिका बाजार विभागामार्फत प्रमाणित करुन घ्यावी लागेल व त्याचाच वापर करावा लागेल.

**९. सदरील ठेका हा गौळवाडा बाजार घाऊक बाजारापुरता मर्यादित असेल.**

१०. ज्या ठेकेदारास दरपत्रक मंजुर होईल अशा मंजुर दरपत्रक धारकाने जाहीर दरपत्रक सुचनेत नमुद केले प्रमाणे ५०% रक्कम डिमांड ड्राफ्टने जमा करुन करारनाम्यासाठी आवश्यक रक्कमेचे स्टॅम्प पेपर कार्यालयात जमा करुन करारनामा करुन घ्यावा.

११. बाजार शुल्क वसुली करताना नागरीकांशी, व्यापा-यांशी सौजन्याने वागावे कोणत्याही प्रकारची तक्रार येणार नाही याची दक्षता घ्यावी.

१२. दरपत्रक अटी शर्तीप्रमाणे व मंजुर दाराप्रमाणे काम करण्यास नकार दिला व कामात काही वाद विवाद निर्माण झाल्यास मा.आयुक्त यांचा निर्णय अंतीम राहील, व त्याचे अनुपालन करण्याचे ठेकेदारावर बंधनकारक राहील. या विरुध्द दाद मागत येणार नाही.

१३. वसुलीच्या कामाच्या तपासणीचे अधिकार महानगरपालिकेचे आयुक्त, उप. आयुक्त, सहा आयुक्त हयांना राहील.

१४. अभिकर्त्यास वसुलीकामी नेमणूक केलेल्या व्यक्तीच्या नावाची यादी महानगरपालिकेस देणे बंधनकारक आहे. व वसूली करणाऱ्याचे ओळखपत्र उप. आयुक्त यांचेकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे.

१५. दरपत्रक धारकाने त्या वर्षाच्या कालावधीत ठेक्याची वसुली लागेल. सदरचा ठेका परस्पर दुसऱ्यास हस्तांतर करता येणार नाही. तसे केल्यास अगर निदर्शनास आल्यास ठेका तात्काळ रद् करण्यात येईल.

१६. महानगरपालिकेच्या अटी - शर्ती आपणांवर बंधनकारक राहतील व इतर कायद्यातील तरतुदी आपणांवर बंधनकारक राहतील.

१७. सदरील कामाकरिता महानगरपालिका आपणांस कोणतेही मनुष्यबळ, यंत्र, अवजारे, वाहन देणार नाहीत. आवश्यकतेनुसार स्वत:चे साहीत्य व मनुष्यबळ वापरुन सेवा पूर्णपणे उपलब्ध करावयाची आहे.

१८. दरपत्रकेच्या वैध कालावधीमध्ये महानरपालिकेच्या संमतीशिवाय दरपत्रक धारकास त्याची दरपत्रक रद्द करता येणार नाही तथापि तशी परिस्थिती उद्भवल्यास पुर्वग्रह दुषित शिवाय महानगरपालिका ठेकेदाराची इसारा रक्कम जप्त करेल व ठेकेदारास दंडात्मक कारवाईस पात्र असेल.

१९. मंजुर ठेकेदारास मंजुर रक्कमेवर १८% GST भरणे बंधनकारक राहील.

[illegible] ही ठिकाणी नविन फेरीवाले बसविण्यास प्रोत्साहित करता येणार नाही. तसे केल्यास अगर निदर्शनास [illegible] ठेका तात्काळ रद्द करण्यात येईल.

२१. [illegible] देकार स्विकारण्याचा / नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त यांचा राहील.

२२. रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५चे कलम १६(१) (आय) व कलम ४४ (१) (ब) अनुषंगाने विहीत केलेले प्रतिज्ञापत्र (सोबत मसुदा आहे).

२३. वरील सर्व अटीं व शर्तीत बदल करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना राहिल.

२४. लिफाफा क्र. १ मध्ये खालील नमुद बाबींची कागदपत्र स्कॅन करुन अपलोड करावी.

अ) जी.एस.टी प्रमाणपत्र

ब) पॅनकार्ड

क) आधारकार्ड

ड) इसारा रक्कम भरलेबाबतची पावती

इ) यापुर्वी दैनिक बाजार फी वसूली केल्याचा अनुभव दाखला

लिफाफाक्र २ मध्ये फक्त रक्कम/ दर नमुद करावेत. (अंकात व अक्षरात)

२५. वरील सर्व अटी व शर्तीचे पालन करणे आपणांस बंधनकारक असेल अन्यथा ठेका रद्द करण्यात येईल.

उप.आयुक्त (दै. बाजार फी)
वसई-विरार शहरमहानगरपालिका

# प्रतिज्ञापत्र

मी/आम्ही याद्वारे असे नमुद करतो की, महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम १६(१) (आय) व कलम ४४(१)(ब) च्या तरतुदीच्या ज्या खाली केलेल्या आहेत, माहिती आहे आणि गंभिरपणे नमुद करतो की, महानगरपालिकेशी किंवा महानगरपालिकेच्या अधिन किंवा महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या संविदेमध्ये महानगरपालिकेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हीतसंबंध किंवा आमच्याशी भागीदारी नाही.

कलम १६(१) (आय) :- यापुढे तरतूद केली असेल त्या व्यतिरीक्त, महानगरपालिकेच्या आदेशावरुन केलेल्या कोणत्याही कामात किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेमध्ये जीचा स्वत:चा किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणताही हिस्सा किंवा हीतसंबंध असेल.

कलम ४४ (१) (ब) :- पालिका सदस्य म्हणून किंवा महानगरपालिकेच्या कोणत्याही समितीचा सदस्य म्हणून ज्या कोणत्याही बाबतीत कलम (३), खंड (अ),(ब),(क), (३) (ई) व (ग) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्यांचा किंवा ज्यांचा भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रितीने कोणत्याही हिस्सा किंवा हितसंबंध असेल. मग अशा हिश्याची किंवा हितसंबंधाची किंमत असो, किंवा ज्यात ज्याच्या अशीलाचा उपकर्त्यांचा किंवा इतर व्यक्तींच्या वतीने व्यवासायीक दृष्ट्या त्याचा हितसंबंध किंवा हिस्सा असेल अशा कोणत्याही बाबतीत मतदान करील.

दरपत्रकधारकाचे नाव :- सही

पत्ता :-

दिनांक :-

साक्षीदाराचे नाव :- साक्षीदाराचे सही :-

पत्ता :-

दिनांक :-